## माहितीचा अधिकार अधिनियम -2005 कलम 4(1)(ब)(12)
## सन 2023 (कृषी विभाग)
## पंचायत समिती तासगांव

**योजनेचे नाव-जिल्हा परिषद स्वीयनिधी**

1) जि.प.सेस.पावर ट्रीलर/ चापकटर/ट्रॅक्टर/बॅटरी स्प्रें पंप/HDPE पाईप

2) **पं**.स.सेस- चापकटर

**<u>लाभार्थीचे निवडीचे निकष</u>** -

1) लाभार्थी शेतकरी हा सांगली जिल्हयातील रहिवासी असावा. (स्वत:चे नावे जमीन असावी.)विहीत नमुन्यातील अर्ज.
2) यापूर्वी जि.प.चापकटर मशीन/कडबाकुटटी/ ट्रॅक्टर /पी.व्ही.सी.HDPE पाईप/औषध फवारणी पंप या वैयक्ति योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
3) स्वत:चे नावे ७/१२ **व खाते उतारा असावा.**
4) महिला लाभार्थी व अल्प,अत्यल्प भूधारक शेतक-यांना प्राधान्य राहील.
5) दिव्यांग व्यक्तीना प्राधान्य देण्या येईल.
6) चापकटर मशीन करीता अर्जदार शेतक-यांकडे पशुधन असलेबाबतचा पशुवैदकिय यंत्रणेचा दाखला.

**<u>लाभार्थीचे निवडीची कार्यपध्दती</u>** -

1)लाभार्थीने विहित नमुन्यातील अर्ज पंचायत समितीकडे केला पाहिजे

2)अर्जासोबत संबंधीत लाभार्थीने स्वत:चे नावे असलेल्या जमीनीचा क्षेत्राचा 7/12 खाते उतारा असणे आवश्यक आहे.

**<u>अनुदान वाटपाची निवडीची कार्यपध्दती</u>** -

1) विहित नमुन्यातील लाभार्थीचा अर्ज प्राप्त झाल्या नंतर कृषी अधिकारी/ वि.अ. (कृषी) यांनी सदर प्रस्तावाची कागदपत्राची छाननी üकेल्यानंतर लाभार्थी पात्र / अपात्र ठरवून यादी जिल्हा परिषद स्तरावर सादर करणेत येते.
2) जिल्हा सतरावर, कृषी समितीमध्ये लाभार्थ्यांची निवड करण्यात येते व सदर यादी पंचायत समिती स्तरावर पाठविणेत येते. सदर यादीमधील लाभार्थी यांना साहित्य विहित मुदतीत डी.बी.टी. तत्वावर खरेदी करून बीले पंचायत समिती स्तरावर सादर करणेबाबत कळविणेत येते.
3) सदर बीले जिल्हा परिषद, सांगली कृषी विभागाकडे सादर केली जातात व मा.कृषी विकास अधिकारी जिल्हा प. सांगली यांचेकडुन अनुदान संबंधित लाभार्थी यांचे बँक खातेवर वर्ग करणेत येते.

**माहितीचा अधिकार अधिनियम -2005 कलम 4 (1) (ब) (12)**

**कृषी विभाग**
**पंचायत समिती तासगांव**

**योजनेचे नाव- राष्ट्रीय बायोगॅस संयंत्र**

**लाभार्थी निवडीचे निकष -**

१) लाभार्थीच्या स्वत:च्या मालकीची जागा पाहीजे लाभार्थीने बायोगॅस बांधकामाची खादी आणि ग्रामदयोग आयोग किंवा जिल्हा परिषदेकडून यापुर्वी अनुदान मागीतले किंवा घेतलेले नसावे.

२) लाभार्थीकडे स्वत:च्या मालकीची संयंत्राच्या क्षमतेनुंसार जनावरे पाहिजेत.

३) लाभार्थीने बायोगॅस संयंत्र स्व खर्चाने प्रशिक्षीत गवंडया कडुन किंवा संस्थेकडून बांधून पूर्ण केले पाहिजे.

**लाभार्थी निवडीची कार्यपध्दती -**

1) बायोगॅस संयंत्र धारकाने विहित नमुन्यातील अर्ज पंचायत समितीकडे केला पाहिजे

2) संयंत्र कार्यान्वित पाहिजे

3) उदिदष्टप्रमाणे क्रमवारी नुसार अर्जाची नोंद देऊन लाभार्थीचा अनुदान मंजुरी प्रस्ताव जि.प.कडे प्रस्ताव सादर केले जाते.

**अनुदान वाटपाची कार्यपध्दती**

विहीत नमुन्यात अर्ज पंचायत समितीस प्राप्त झाल्यावर कृषी अधिकारी / विस्तार अधिकारी (कृषी) यांनी प्रत्यक्ष संयंत्रची पहाणी करुन जिल्हा परिषदेस प्रस्ताव सादर केला जातो. कृषी विकास अधिकारी यांचेकडून अनुदान व यादीस मंजुरी नंतर लाभार्थीचे नावे अनुदान बँक खाती जमा केले जाते.

**माहितीचा अधिकार अधिनियम -2005 कलम 4(1)(12)**
**सन 2025 कृषी विभाग**
**पंचायत समिती तासगांव**

**योजनेचे नाव-** अनुसुचित जाती उपाययोजनेंर्तगत अनुसुचीत जाती/ नवबौदध शेतक-यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देणेची योजना

**उदिदष्टः-** अनुसुचित जाती व नवबौध्द शेतक-यांचे उत्पादन वाढवुन त्यांचे जीवनमान उचवणे. (अर्ज ऑनलाईन mahadbt maharashtra.gov.in/Farmer/login वर करावा.)

योजनेमध्ये अनुसुचित जाती व नैावबौध्द शेतक-यांना निवड करताना खालील निकष राहतील.

१) जमिन धारकांना शेतक-याजवळ त्यांच्या स्वत:च्या नावे ०.४० हेक्टर किंवा ६.०० शेतजमीन असावी. जमीन धारणेचा दाखला 7/12 व 8 अ मध्ये देणेत यावा

२) जातीचा दाखला लाभार्थी हा अनुसुचीत जाती व नवबौध्द शेतकरी असला पाहिजे दारिद्रय रेषेखालील लाभार्थीस प्राधान्य राहिल.

३) बँक खाते,आधार कार्डाशी संलग्न असणे आवश्यक आहे.

**लाभार्थी निवड सामिती-**

१) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद - अध्यक्ष
२) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी - सदस्य
३) कार्यकारी अभियंता ,लधुसिंचन,जिल्हा परिषद- सदस्य
४) भुजल सर्व्हेक्षण यंत्राचे जिल्हा स्तरीय अधिकारी सदस्य
५) सहा.आयुक्त समाजकल्याण - सदस्य
६) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी (जि.प.) -सदस्य
७) कृषि विकास अधिकारी - सदस्य सचिव

**लाभार्थीची विस्तृत माहिती -**

| अ.क | बाब | अनुदान मर्यादा रुपये |
|---|---|---|
| १ | नविन सिंचन विहीर | रुपये ४,००,०००/- |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | रुपये १,००,०००/- |
| ३ | शेततळे प्लास्टीक अस्थरीकरण | रुपये २,००,०००/- |
| ४ | इनवेल बोअरिंग | रुपये ४०,०००/- |
| ५ | विज जोडणी आकार | रुपये २०,०००/- |
| ६ | पंपसंच | रुपये ४०,०००/- |
| ७ | सोलार पंप | रुपये ५०,०००/- |
| ८ | एच.डी.पी.ई./ पी.व्ही.सी.पाईप | रुपये ५०,०००/- |
| ९ | तुषार सिंचन संच (पूरक अनुदान) | रुपये ४७,०००/- |
| १० | ठिंबक सिंचन (पूरक अनुदान) | रुपये ९७,०००/- |
| ११ | यंत्र सामुग्री (औजारे) | रुपये ५०,०००/- |
| १२ | परस बाग | रुपये ५,०००/- |

**अनुदानाची स्वरुप/पद्धती**

या योजने अंर्तगत निवड केलेल्या लाभार्थ्यांना देय अनुदानाची रक्कम व रोख स्वरुप न देता F T M S/ द्वारे दिले जाते. या योजनेमध्ये १२ बाबीबर अर्थसहाय्य देणेत येते असले तरी सर्वच बाबींचा लाभ लाभार्थीस आवश्यक आहे असे अभिप्रेत नाही.

## माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4 (ब)(12)
## (आरोग्य विभाग) पंचायत समिती, तासगांव

योजनेचे नाव- केंद्र पुरस्कृत प्रजनन व बालआरोग्य, आर सी एच कार्यक्रम टप्पा कमांक 2, जननी सुरक्षा योजनेच्या अमंलबजावणीबाबत

1.योजनेचे उदिदष्ट - राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील (मुख्यत: चाळी, झोपडपट्टी व गलिच्छ वस्ती इ.),दारिद्रय रेषेखालील व अनुसुचित जाती व अनु.जमातीच्या महिलांचे, आरोग्य संस्थान मध्ये होणा-या प्रसुतीचे प्रमाण वाढविणे व माता मृत्यू व अर्भक मृत्यू प्रमाण कमी करणे असे आहे.

2. लाभार्थी पात्रता -

1.ग्रामीण भागातील सदर गर्भवती महिला दारिद्रय रेषेखालील असावी दारिद्रय रेषेखालील असलेचे कागदपत्र उपलब्ध नसलेस संबंधित तहसिलदार / तलाठी किवा ग्रामपंचायतीने दिलेले प्रमाणपत्र पुरावा गृहीत धरणेत यावा.

2.सदर योजनेचा लाभ अनु.जाती., अनु. जमाती. सर्व दारिदय रेषेखालील असो / नसो लाभार्थ्याना देय राहील

3. सदर लाभार्थी महिलेचे वय प्रसुती पूर्व नोंदणी (गरोदर माता )((ए एन सी) करताना कमीत कमी 19 वर्षे असावे

4.सदर योजनेचा लाभ 2 जीवंत अपत्य पर्यत देय राहील

5. शासकीय किंवा मान्यताप्राप्त रुग्णालयात प्रसुती झालेस र.रु. 700/- अनुदान देण्यात येते.

**<u>योजनेचे अंतर्गत मिळणारे लाभ</u>**

1.ग्रामीण क्षेत्राकरिता - बाळंतपणासाठी शासकीय ग्रामीण आरोग्य संस्थेत लाभार्थी आल्यावर लगेच रु. 500/-एवढे एक रक्कमी अनुदान फक्त लाभार्थीनाच दयावे. तसेच आरोग्य संस्थेमध्ये बाळंतपण झालेनंतर सदर संस्थेने लाभार्थी स रु.200/- एवढे अतिरिरक्त अनुदान देखील दयावे.

**<u>अनुदान वाटपाची कार्यपध्दती</u>**

सदर अनुदान ग्रामीण भागाकरिता वैदयकीय अधिकारी /आरोग्य सेविका यांचे मार्फत वाटप केले जाईल.

योजनेचे नांव- जननी सुरक्षा योजना.

उदिदष्ट-राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील (मुख्यत: चाळी, झोपडपट्टी व गलिच्छ वस्ती इ.)दारिद्रय रेषेखालील व अनुसुचित जाती व अनु.जमातीच्या महिलांचे आरोग्य संस्थां मध्ये होणा-या प्रसुतीचे प्रमाण वाढविणे व माता मृत्यू व अर्भक मृत्यू प्रमाण कमी करणे असे आहे.

**<u>योजनेच्या अटी व माहिती –</u>**

1. या योजनेत दारिद्रय रेषेखालील नोंद झालेल्या महिलांना मोबदला दिला जाईल.

2.अनु.जाती व जमाती च्या महिलांना ही अट लागू नाही

3. सदर लाभार्थी महिलेचे वय प्रसूती पूर्व नोंदणी ((ए एन सी) करताना कमीत कमी 19 वर्षे असावे

4.सदर योजनेचा लाभ 2 जीवंत अपत्यापर्यत देय राहील

5.आरोग्य संस्थामध्ये बाळंतपण झालेस अतिरिक्त रु.200/-लाभार्थीना देय राहील परंतु यासाठी लाभार्थीने दारिद्रय रेषेखालील व वयाचे दाखले सादर करणे आवश्यक आहे.

6.सदर महिलेच्या गरोदरपणातील किवा प्रसुतीकाळातील बाळंतपणा करीता/सिझरिंग / शस्त्रक्रिया करावयाची झाल्यास व त्यासाठी शासकीय रुग्णालयात सेवा देणेसाठी रु 1,500/- पर्यत अनुदान देय राहील. त्यापेक्षा जास्त होणारा खर्च लाभार्थीस करावा लागेल (संपर्क- सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र)

**योजनेचे नाव- सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना**

उदिदष्ट- स्त्रीयांचा सामाजिक दर्जा उंचविणेच्या दृष्टीने कुटुबांत केवळ 1/2 मुलीवर शस्त्रक्रिया करणा-या जोडप्यांना प्रोत्साहन देणे

**योजनेच्या अटी व माहीती**

१. या योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील नोंद झालेल्या जोडप्यास मोबदला दिला जाईल.
२. 1 मुलीवर शस्त्रक्रिया केल्यास 10,000/- रु व 2 मुलीवर शस्त्रक्रिया केल्यास 5,000/- युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया (चाइल्ड करीअर प्लॅन ग्रोथ फंड) सर्टीफिकेट स्वरुपात मिळतील
३. मुलीचे वय 18 वषे झाल्याखेरीज मोडता येणार नाही
४. वरील योजना मधील अंतर्भूत मुलगी जर 10 वी उत्तीर्ण झाली तर त्यांना प्रत्येकी रु. 5,000/- 5 वर्षाची मुदत ठेव देणेत येईल मात्र सदर मुलगी किवा मुली यांना 20 वर्षाचे होई पर्यत विवाह न केल्यास उक्त मुदत ठेव देय राहील.
५. दिनांक 01.08.2017 पुर्वी 2 अपत्य झालेल्या लाभार्थींना याचा लाभ मिळेल.

आवश्यक कागदपत्रे-

1.पती पत्नी व मुलीचे जन्माचे दाखले 2. शस्त्रक्रिया प्रमाणपत्र 3.गटविकास अधिकारी यांचा दारिद्रय रेषेखाली असलेबाबतचा दाखला 4.कुटूंबाचे वार्षीक उत्पन्न 25,000/- च्या मर्यादित असावे 5.सदर जोडप्यापैकी कोणत्याही 1 व्यक्तीने यापूर्वी र्निबीजीकरण शस्त्रक्रिया केलेली नसावी. 6.लाभार्थीना 1/2 मुलगी असाव्यात, मुलगा नसावा. 7. पहिल्या मुलीच्या जन्माच्या वेळी आईचे वय कमीत कमी 19 वर्षे असावे.

(संपर्क- सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र)

**माहितीचा अधिकार अधिनियम - 2005 कलम 4(1)(ब) (12)**
**( B.R.C.) पाणी व स्वच्छता विभाग) पंचायत समिती, तासगांव .**

१) **योजनेचे नाव:-स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालय नसलेल्या पात्र लाभार्थीना ग्रामपंचायतीकडून वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी 12,000/- रुपये प्रमाणे अनुदान देणे.**

**लाभाथी निवडीचे निकष-**

१) लाभार्थी हा दारिदय रेषेखालील मागासवर्गीय (ST,SC) किंवा अल्पभुधारक, भुमिहीन शेतमजूर अपंग कुटूंब प्रमुख महिला कुटुंबप्रमुख असावा

२) लाभार्थीचे पूर्वीचे शौचालय नसावे.

३) लाभार्थीकडेशौचालय बांधकामासाठी स्वत:च्या मालकीची पुरेशी जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

४) लाभार्थीने यापूर्वी शौचालय बांधकामासाठी इतर कोणत्याही योजनेतून अनुदान घेतलेले नसावे.

५) लाभार्थीस मिळणा-या अनुदानापेक्षा जादा लागणारी रक्कम रोख / श्रमदान/ साहित्य स्वरुपात देणे आवश्यक आहे.

६) शौचालय बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ग्रामसेवक यांचेकडून काम पूर्णत्वाचा मूल्यांकन दाखला प्राप्त झालेनंतर अनुदान आदा करता येईल.

७) शौचालय पूर्ण झालेनंतर अनुदान मागणी अर्जासोबत दा.रे.खालील (ST,SC),अल्पभुधारक, भुमीहीन शेतमजूर असलेबाबत तलाठी यांचा दाखला महिला कुटुंबप्रमुख/ अपंग असल्यास त्याचा दाखला लाभार्थीने दारिद्रय रेषेखालील असले बाबत ग्रामसेवकाचा दाखला,जागेच्या मालकी बाबतचा नमुना नं.8 उतारा, काम पूर्णत्वाचा दाखला,शौचालय फोटो योजनेचे लाभार्थी नावासह.

**लाभाथी निवडीची कार्यपध्दती.**

१) ग्रामपंचायत पातळीवर ज्यांचे घरी शौचालय नाही अशा व पात्र लाभार्थीची निवड ग्रामपंचायत पातळीवर केली जाते.

२) ज्यांचे घरी शौचालय बांधकामासाठी पुरेशी जागा उपलब्ध अशा लाभार्थीस अनुदान आदा केले जाते.

३) मिळणा-या अनुदानापेक्षा जादा लागणारी रोखरक्कम रोख / श्रमदान/ साहित्य स्वरुपात घालणेची तयारी असलेल्या लाभार्थीना अनुदान आदा केले जाते.

४) केंद्र शासनाच्या संकेत स्थळावरती शौचालय नसलेले लाभार्थीना अर्ज करता येईल.

**अनुदान वाटपाची कार्यपध्दती.**

१) गावपातळीवर पात्र लाभाथीना रक्कम स्वखर्चाने शौचालय बांधून पूर्ण केलेनंतर लाभार्थीस अनुदान केले जाते.

२) शौचालय बांधून पूर्ण झालेनंतर ग्रामपंचायतीस संबधित लाभार्थीने ग्रामपंचायतीस कळविणेत आवश्यक आहे व ग्रामपंचायतीकडून मागणी अर्ज प्राप्त करुन तालुकास्तरावरती जमा करुन पडताळणी झालेनंतर अनुदान आदा केले जाते.

३) लाभार्थीने अनुदान मागणी अर्जासोबत काम पूर्णत्वाचा फोटो, मुल्यांकन, शौचालयाची नोंद असलेल्या नमुना नंबर 8 चा उतारा, ग्रामपंचायत थकबाकी नसलेचा दाखला विहित नमुन्यातील प्रस्तावासह सादर केलेनंतर PFMS प्रणाली द्वारे लाभार्थीचे बँक खातेवर आदा करणेत येते.

४) गाव पातळीवरुन अशा बांधलेल्या सर्व शौचालयाच्या लाभाथीचे अनुदान मागणी अर्ज ग्रामपंचायतीकडे प्राप्त झालेनंतर सदर अर्जाची छाननी पंचायत समिती पातळीवरुन केलेनंतर पात्र लाभार्थीना आदा केले जाते.

**माहितीचा अधिकार अधिनियम -2005 कलम 4(1) (ब)(12) ग्रामपंचायत विभाग -2025**
**(ग्राम पंचायत विभाग) पंचायत समिती, तासगांव**

**१) योजनेचे नाव - स्वच्छ भारत अभियांनातर्गत ग्रामीण भागातील आदर्श सार्वजनिक शौचालय बांधणे निवडीचे निकष -**

१) ग्रामीण भागातील ज्या लाभार्थीयांचे घरी शौचालय बांधकामासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही अशा एकाच वॉर्डातील/गल्लीतील किमान 20 ते 25 महिलांसाठी ग्रामपंचायतीमार्फत ग्रामपंचायतीचे मालकीचे जागेमध्ये जागेच्या उपलब्धतेनुसार किमान 4 शिटचे एक युनिट बांधुन दिले जाते.

२) कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 10% रक्कम लोकवर्गणी म्हणुन संबधित लाभधारकांनी ग्रा.पं.कडे भरणा करणे आवश्यक आहे.

३) सदर सार्वजनिक शौचालयासाठी पाण्याची, लाईटची सोय ग्रामपंचायतीने करावयाची आहे.

४) सार्व.शौचालयाचे दुरूस्ती व देखभालीची जबाबदारी ग्रामपंचायतीने घेणेची आहे.

५) सार्व.शौचालयासाठी मिळणा-या अनुदानापेक्षा जादा लागणारी रक्कम ही ग्रामपंचायतीने त्याचे स्वनिधी / 15 वा वित्त आयोगातून घालून शौचालय पूर्ण करणेची हमी घेणे आवश्यक आहे.

६) सार्व. शौचालय बांधकामासाठी आवश्यक असणारी जागा ही ग्रामपंचायतीचे स्वत:चे मालकीची असणे आवश्यक आहे.

**अनुदान वाटपाची कार्यपध्दती .**

सार्व. शौचालयासाठी मंजूर असलेले अनुदान हे ग्रामपंचातीने काम पूर्ण केलेनंतर काम पूर्णत्वाची सक्षम कागदपत्रे (मुल्यांकन /पूर्णत्वाचा दाखला/काम पूर्ण झाले ची नोंद ग्रापं.चे प्रॉपर्टी रजिस्टरला न.नं.25 ) ला घेऊन त्याचा उतारा पंचायत समितीकडे सादर केलेनंतर ग्रामपंचायतीस मंजूर अनुदान अदा केले जाते.

## प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण राज्य शासनाने सुरू केलेली आहे.
## ( डी.आर.डी.ए. विभाग) पंचायत समिती, तासगांव

**निधीची उपलब्धता :-** द्यावयाचे आहेत.

**लाभार्थी पात्रतेचे निकष -**

1) लाभार्थी कुटूंब हे आवास प्लस PWL यादीतील व लाभक्षेत्रात वास्तव्य करणारे असावे./पुरावा असावा.

2) या पूर्वी इंदिरा आवास योजना / प्रधानमंत्री ग्रामोदय योजना तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती लाभ इच्छुक कुटुंबाचे मालकीचे घर असू नये.

3) स्वत:ची जागा असल्यास घर बांधणी करण्यासाठी लाभार्थी पात्र असेल.

4) योजनेंतर्गत लाभार्थ्यांने स्वत:चे घरकुल स्वत:च बांधावयाचे आहे.

5) बांधकाम क्षेत्रफळ किमान २६९ चौ.फु. चटई क्षेत्र असावे.

6) बांधलेल्या घरामध्ये लाभार्थ्याच्या कुटुंबाव्यतिरिक्त इतर कोणीही वास्तव्य करू नये.

7) या योजनेतील सदनिका प्रामुख्याने त्या कुटुंबातील स्त्रीच्या किंवा पती पत्नीच्या संयुक्त नावे नोंदविण्यात येते.

**लाभार्थी निवडीची कार्यपध्दती -**

या योजनेतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून अथवा शासन स्तरावरुन प्रत्येक तालुक्यासाठी गांव निहाय देणेत आलेल्या उद्दीष्टानुसार प्राधान्यक्रम यादीनुसार करण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे -**

1) लाभार्थी आवास प्लस PWL यादीतील असावा.
2) लाभार्थी बेघर /घर राहण्या योग्य नसलेचा ग्रापंचा दाखला.
3) लाभार्थीच्या रेशन कार्डाची झेरॉक्स /मतदार यादीचा क्रंमांक
4) ग्रामसभा ठराव
5) जागेचा उतारा नं.8.
6) मंजूर रक्कमेपेक्षा जादा रक्कम स्वत: घालणेस तयार असलेचे हमीपत्र
7) यापूर्वी लाभार्थीने कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ घेतले नसलेबाबतचा ग्रापंकडील दाखला
8) आधारकार्ड झेरॉक्स
10) जॉब कार्ड ऑनलाईल नोंदणी केलेले झेरॉक्स.
11) बँक पासबुक झेरॉक्स आधार लिंक केलेले असावे.

**निधी वितरणाची पद्धत -**

अ) बांधकाम सुरू करणेपूर्वी पहिला हप्ता:- 15,000/-
ब) जोते लेवल पर्यंत बांधकाम दुसरा हप्ता:- 70,000/-
क) लेंटल लेवल पर्यंत बांधकाम तिसरा हप्ता:- 30,000/-
ड) सर्व काम पुर्ण झालेनंतर अंतिम हप्ता - 5,000/-

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1) ब (12)**
**पंचायत समिती तासगांव (समाजकल्याण विभाग)**

अनुक्रमणिका

| अक्र | योजना नांव | शासन निर्णय |
|---|---|---|
| 1 | दिव्यांग घरकुल योजना | जिल्हा स्तरीय योजना |
| 2 | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे. | शासन निर्णया क्र.दवसु.-1098-प्रक्र353-मावक 2 दि.4 मार्च 1999 |
| 3 | महाराष्ट्रातील मान्यवर वृध्द साहित्यीक व वृध्द कलावंताना मानधन | शासन निर्णय, क्र वृकमा 2012/प्र.क्र.117/सां.कां-4, दि. 7 फेब्रुवारी 2014<br>शासन निर्णय, क्र वृकमा 4321(15)/प्र.क्र.145/.सां.का.4, दि. 16 मार्च 2024<br>पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग |

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1) ब (12)**
**पंचायत समिती तासगांव (समाजकल्याण विभाग)**

**योजनेचे नांव — दिव्यांग घरकुल योजना**

लाभार्थी निवड निकष -1) अर्जदार हा दिव्यांग प्रमुख असावा

2) सक्षम प्राधिकरणाकडील अपंग प्रमाणपत्र असावे

3) अर्जदाराची स्वत:च्या मालकीची किमान 269 चौरस फुट जागा असावी

4) मे तहसिलदार यांचा वार्षिक उत्तपन्न र.रु.1,00,000/-च्या आत असलेचा दाखला असावा

5) ग्रामसभेमध्ये दिव्यांग घरकुल लाभार्थी निवड झालेचा ठराव असावा

**लाभार्थीच्या पात्रता संबंधिताच्या अटी व शर्थी**

1. अर्जदाराचे मालकीचे इतर ठिकाणी घरजागा नसलेचा ग्रामसेवक दाखला असावा
2. किमान 269 चौरस फुट जागा असलेचा ग्रामसेवक दाखला सोबत रेशन कार्ड झेरॉक्स प्रत
3. अर्जदार अपंग असलेचे सक्षम प्राधिकरणाकडील प्रमाणपत्र प्रमाणीत प्रत.
4. मागील वर्षाचे अर्जदाराचे वार्षिक उत्तपन्न र.रु. .1,00,000/- चे आंत असलेचा मे. तहसिलदार यांच्या दाखला
5. अर्जदारास यापूर्वी शासकीय योजनेतून मंगलोरे कौले / पन्हाळी पत्रे दिली नसलेचा ग्रामसेवक यांचा दाखला
6. अर्जदारास यापूर्वी इंदिरा आवास / जवाहर रोजगार योजनेतून घरबांधणीस मदत दिली नसलेचा ग्रामसेवक यांचा दाखला
7. ग्रामसभेमध्ये लाभार्थी निवड केलेचा ग्रामपंचायतीचा ठराव
8. शौचालय बांधणार असलेचे हमीपत्र
9. जादा लागणारी रक्कम घालून घरकूल पूर्ण करीत असलेचे हमी पत्र
10. बँकेचे खाते आधारलिंक असलेचे झेरॉक्स. व आधारकार्ड झेरॉक्स प्रत.

**लाभार्थी निवड कार्यपध्दती**

1. वरील प्रमाणे प्रस्ताव या कार्यायांकडे प्राप्त झालेनंतर विस्तार अधिकारी यांचेकडे सदरचा प्रस्ताव चौकशीसाठी दिला जातो.

2. पात्र लाभार्थी असेल तर सदरचा प्रस्ताव मे समाजकल्याण अधिकारी जि.प.सांगली यांचेकडे मंजूरीसाठी सादर केला जातो.

3. समाजकल्याण समितीमध्ये लाभार्थी निवड केली जाते.

**लाभाची व अनुदान वाटपाची विस्तृत माहिती**

मे. समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांचेकडील आदेशान्वये मंजूर लाभार्थी यादी प्राप्त झालेनंतर रु. 15,000/- पहिला, दुसरा,तिसरा व अंतिम मुल्यांकनानुसार आदा केला जातो.

1) घरकुलाचे पाया लेव्हल पर्यंत काम पूर्ण झालेनंतर उप अभियंता (इवद) यांचा मुंल्याकन दाखला प्राप्त झालेनंतर दुसरा हप्ता मंजूरीचा आदेश प्राप्त झाल्यांनतर मुल्यांकनानुसार हप्ता आदा केला जातो.

2) घरकुल लेंटल लेवल पर्यंत काम पुर्ण झाल्यानंतर उपअभियंता यांचेकडून मुल्यांकन दाखला प्राप्त झालेनंतर तिसरा हप्ता मंजूरीचा आदेश प्राप्त झाल्यांनतर मुल्यांकनानुसार हप्ता आदा केला जातो.

3) घरकुल पुर्ण झाल्यानंतर उप अभीयंता यांचेकडुन पुर्णत्वाचा दाखला प्राप्त झाल्यानंतर चौथा व अंतिम हप्ता मंजुरीचा आदेश प्राप्त झाल्यानंतर मुल्यांकन नुसार हप्ता केला जातो.

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1) ब (12)**

**पंचायत समिती तासगांव**

**(समाजकल्याण विभाग) पंचायत समिती, तासगांव**

**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे.**

योजनेची कार्यपध्दती - ग्रामीण भागातील दलितवस्तीमधील अनुसूचित जातीच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी खालीलप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणावर

1. 10 ते 25 पर्यंत – 4 लाख 2. 26 ते 50 पर्यंत – 10 लाख 3. 51 ते 100 पर्यंत – 16 लाख

4. 101 ते 150 पर्यंत – 24 लाख 5. 151 ते 300 पर्यंत – 30 लाख 6. 600 पासुन पुढे – 40 लाख

अनुदान देण्यात येते या योजनेअंतर्गत पाणी पुरवठा, समाजमंदिर, शौचालय ,अंतर्गत रस्ते गटर संरक्षक भिंती इ. कामे करण्यात येतात.

पात्रतेचे निकष **(अटी व शर्ती)**

१) मंजूर रकमेपेक्षा आराखडयापेक्षा लागणारी रक्कम ग्रामपंचायतीने आपल्या फंडातूनक किंवा लोकवर्गणीतून किंवा श्रमदानातून उपलब्ध करून काम करावे.

२) संबधित गटविकास अधिकारी व ग्रामसेवक यांचे नावे दलित वस्ती सुधार योजनेचे संयुक्त खाते जवळच्या जिल्हा मध्यवर्ती बँकेत उघडावे.

३) ग्रामसेवकाने झालेल्या कामाची रक्कम आदा करताना उपअभियंता यांचेकडून मुल्यांकन दाखला प्राप्त करावा व मुल्यांकनानुसार खात्यातून रक्कम काढताना ग्रामपंचायतीची मंजूरी व ठराव घेऊनच कार्यवाही करावी.

४) ज्या जागेवर काम करावयाचे आहे ती जागा ग्रामपंचायतीची/जिल्हापरिषदेची /पचायत समितीची शासकीय असावी.

५) जी कामे हाती घेण्यात आली आहेत ती दलित वस्ती तच असणे आवश्यक आहे.

६) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास मजूर रक्कम ग्रामपंचायतकडून वसूल केली जाईल.

७) मंजूर कामाची दुरुस्ती व देखभालचा खर्च ग्रामपंचायत करत असल्याचा ठराव

**अनुदान आदा करण्याची कार्यपध्दती**

१) मे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद यांचेकडील आदेशान्वये दलित वस्तीसाठी रक्कम प्राप्त झाल्यानंतर ती रक्कम गट विकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या संयूक्त खाती जमा करण्यात येते.

२) सरपंच ग्रामपंचायत यांचेकडून कामबाबतचे करारपत्र करुन घेवून मंजूर रकमेच्या ९0 टक्के रक्कम ग्रामपंचायतीस आदा करणेत येते.

३) संबधित उपअभियंता यांचे मूल्यांकन पत्रानुसार रक्कम आदा करता येते.

४) मंजूर काम पूर्ण झाल्यांनतर संबधित उपअभियंता यांचा पूर्णत्वाचा दाखला व संबधित जिल्हा पारिषदेचे समाजकल्याण अधिकारी यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन 10 टक्के रक्कम आदा करता येते.

**योजनेचे नांव - महाराष्ट्रातील मान्यवर वृध्द साहित्यिक व वृध्द कालवंताना मानधन योजना**

**निकष**

१) कलाकाराचे नांव (स्त्रि/पुरुष) 50 वर्षापेक्षा जादा असावे.

२) वयाचा दाखला, नगरपालिका, ग्रामपंचायत यांचा जन्म मृत्यू नोंदवहीतील प्रमाणित उतारा शाळा सोडलेचा दाखला, वैद्यकिय अधिकारी यांचा दाखला

३) कलाकराचे/साहित्यिकाचे वार्षिक उत्पन्न रु. 48,000/- चे आत असलेचा मे. तहसिलदार यांचा दाखला

४) विहित अर्जासोबत कलेविषयीची माहिती छायाचित्र मान्यवर कालावंताचे संस्थेने कालाकार असलेबाबतचे प्रमणित केल्याबाबतचे प्रमाणपत्र

५) स्थानिक नाटयसंस्था/कालाकार संघटना/साहित्यिक परिषदेची स्थानिक शाखा/राज्य/राष्ट्रीय पातळीवरील मान्यता मिळविलेल्या कलावंतांचे प्रमाणपत्र

**कार्यपध्दती**

वरील कागदपत्रानुसार नमुन्यातील फॉर्मसह कलावंतांनी तीन प्रतीत प्रस्ताव सादर केल्यांनतर पात्र कलावंतांचा प्रस्ताव समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांचेकडे मंजूरीसाठी पाठविला जातो. जिल्हा स्तरीय समितीमध्ये पात्र कलाकाराची निवड करण्यात येते.

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1) (ब)(12) पशुसंर्धन विभाग (पशुसंवर्धन विभाग) पंचायत समिती, तासगांव**

**योजना नांव - विशेष घटक योजनेतून म्हैसगट/गायगट व शेळीगट वाटप योजना**

**लाभार्थी निवडीची निकष:** -उपलब्ध अर्जातून लॉटरी पध्दतीने निवड

पात्रतेचे निकष -

१. विहीत नमुन्यातील अर्ज
२. जातीचा दाखला (अनुसूचित जातीचा दाखला)
३. रेशनकार्ड सत्यप्रत (अनिवार्य)
४. जागेचा उतारा 7/12 व खाते उतारा
५. DBT Form
६. फोटो ओळखपत्र झरॉक्स (मतदान कार्ड/आधार कार्ड)
७. अपत्य दाखला:-1 मे 2001 नंतर तिसरे अपत्य नसले बाबतचा (ग्रामसेवकाचा दाखला)
८. ग्रामपंचायत शिफारस पत्र
९. लाभार्थी किंवा कुटुंबातील सदस्य ग्रा.स./पं.स./जि.प.सदस्य नसले बाबत ग्रामपंचायतीचा दाखला
१०. लाभार्थी पती/पत्नी पैकी कोणीही शासकीय सेवेत अथवा सेवानिवृत्त नसले बाबत ग्रामपंचायतीचा दाखला
११. यापूर्वी पशुसंवर्धन योजनेतून लाभ न घेतले बाबतचा ग्रामपंचायतीचा दाखला.
१२. दारिद्रय रेषेखालील असल्यास ग्रामपंचायतीचा दाखला.
१३. अत्यल्प भूधारक दाखला.
१४. अल्प दाखला.
१५. रोजगार स्वयरोजगार कार्यालयाचे नांव नोंदणी कार्डाची सत्यप्रत
१६. बचतगट सदस्य प्रमाणपत्र.
१७. प्रशिक्षण घेतलेल्या प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत
१८. अपंग असल्यास (अपंगत्व प्रमाणपत्र)

**लाभार्थी निवडीची कार्यपध्दती:-निवड** समितीकडून व लॉटरी पध्दतीने निवड करणे.

**अनुदान :-** पात्र लाभार्थ्यास 75% प्रमाणे 2 म्हैसगट 1,20,000/- किंवा 2 गायगट1,05,000/- यासाठी व 10 + 1 शेळीगट यासाठी एकूण रु. 77,659/- इतके अनुदान देय आहे. सदर अनुदान बी.डी.एस.प्रणालीव्दारे लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होते.